Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4  ISSN:-2230-7850

Research Papers

# भारतीय समाज संरचनेतील स्त्री लिंग गुणोत्तर

**डॉ.कल्याण साखरकर**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
फुलसिंग नाईक महिला महाविद्यालय, पुसदजि.यवतमाळ,
महाराष्ट्र राज्य,(भारत)

**प्रस्तावना :–**

जागतिक समाज संरचनेत 'सृष्टी' च्या उत्पत्ती संदर्भात दोन वैचारिक प्रवाह आहेत. एका प्रवाहान्वये सृष्टीची निर्मिती ईश्वराने केलेली आहे. दुसऱ्या प्रवाहाच्या मते, सृष्टीची निर्मिती निसर्गदत्त आहे. सृष्टीच्या उत्पत्तीसंदर्भात हिंदू धर्म, मुस्लिम धर्म व ख्रिश्चन धर्मातील लोकांमध्ये सृष्टीची निर्मिती ईश्वराने केली आहे. हिंदू धर्मातील मनु व शतरुपा, मुस्लिम धर्मातील आदम व हव्वा आणि ख्रिश्च धर्मातील ॲडम व ईव्ह हयांना प्रथम पुरुष व प्रथम स्त्री म्हणून समाजमान्यता आहे. वेद, पुराण व बायबलमध्ये सृष्टीच्या उत्पत्तीच्या तत्वप्रणाली संदर्भात समानता आहे. तर दुसऱ्या वैचारिक प्रवाहाने ईश्वराचे अस्तित्व अस्विकृत केले असून सृष्टीची निर्मिती निसर्गदत्त असल्याचे प्रतिपादन केले जाते.

सृष्टीच्या अस्तित्वा व संवर्धनाकरिता निसर्गदत्त स्त्री व पुरुष या दोन समाजघटकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. जगातील मानवी समाजाचा समतोल एक समान ठेवून अखिल मानवी जातींच्या अस्तित्वाकरिता स्त्री व पुरुषाची लोकसंख्या समान असणे आवश्यक असते. निसर्गसृष्टीने स्त्री व पुरुषांशी कोणताही भेदभाव केला नाही. पुरुष शारीरिक दृष्टीने सक्षम असतो तर स्त्री मानसिक दृष्टीने सक्षम असते. स्त्री–पुरुष प्रजोत्पादनाच्या प्रकार्यात समानतेने सहभागी होतात. ती एक सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने अनिवार्य स्वरुपाची घटना आहे. म्हणून स्त्री व पुरुषांमध्ये असमानतेचा व विशमतेचा विचार करणे अप्रस्तृत मानले जात आहे. म्हणजेच निसर्गाने स्त्री–पुरुष लिंगाच्या गुणोत्तराप्रती समसमान दृष्टीकोनातून विचार केला आहे.

मध्ययुगीन समाजाचा कालखंड इ.स.300 ते 1800 पर्यंतचा आहे. या काळात समाज संरचनेतील बदलाची प्रकिया मंदगतीने सुरु होती. प्रारंभीच्या तीन दशकात संतांचा उदयाचा काळ होता. या तीन दशकानंतरच्या काळात भारतातील अधिकांश प्रदेश सुलतानशाहीच्या अंमलाखाली असल्यामुळे सत्ता, संघर्ष आणि आक्रमणांच्या काळात स्त्रीयांचे जीवन असहय व असुरक्षित झाले होते. अशावेळी एखाद्या स्त्रीला मुलगी झाली तर तिची सुरक्षा कोण करेल वा मुलीला अन्याय व अत्याचारापासून संरक्षण कोण देईल व विविध प्रकारच्या अनिष्ट रुढींमुळे मुलींची हत्या केली जात होती. यामुळे पुरुष लिंगापेक्षा स्त्री लिंगाची संख्या कमी कमी होत गेली आणि यातून स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या निर्माण झाली.

बाराव्या शतकातील संत, मंहत व समाज सुधारकांनी मातृसत्ताक समाज संरचनेतील स्त्रीयांच्या कार्याचे संरचनात्मक व विकासात्मक पैलुचे अधोरेखांकन लक्षात घेवून स्त्रीयांच्या व्यक्तितत्वाला व आत्मशक्तीला जागृत करण्याचे कार्य सुरु केले. या संदर्भात संत जनाबाईने 'स्त्री जन्म म्हणूनी न व्हावे उदासर ' व संत विठामाईने 'तुझी सत्ता देहावरी जान माझे बरी तुझी किंचित नाही' म्हणजे स्त्रीयांचा देह हा परावलंबी असला तरी स्त्रीयांचे मन स्वतंत्र आहे. या स्वतंत्र मनाने स्त्री स्वातंत्र्याची मुर्हूतमेढ केली. पण तत्कालिन परिस्थितीत कोणत्याही प्रकारचा बदल झाला नाही. 17 व 18 व्या शतकातील समाज संरचनेतही स्त्रीयांचा दर्जा कनिष्ठ श्रेणीतील असल्याचे आढळून येते. थोडक्यात 12 ते 18 व्या शतकातील समाज संरचनेत स्त्रीयांचा दर्जा कनिष्ठ श्रेणीतील असल्याचे आढळून येते. यावरुन लिंगाधिष्ठीत गुणोत्तराची समस्येत वृध्दी होत होती.

आधुनिक काळापासून स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक संरचनेतील लिंग गुणोत्तराची समस्या अधिक तीव्र झाली. महात्मा जोतीराव फुले स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रीयांमध्ये उच्च शैक्षणिक अभिरुची निर्माण करुन स्त्रीयांच्या व्यक्तित्व विकासाकरिता प्रयत्न केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे सार्वजानिक दहन करुन स्त्री स्वातंत्र्य व अधिकाराला बहुआयाम उपलब्ध करुन दिला. स्त्रीयांच्या शिक्षणाप्रतीची भूमिका अधिक सकस पध्दतीने विकसित करण्याकरिता प्रयत्न केले. स्त्रीयांना समता, स्वातंत्र्य व सहानुभूती उपलब्ध करुन दिली तर स्त्रीयांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होईल. या विकासाने कौटुंबिक, आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्राचा सुध्दा विकास गतिशीलतेने घडून येवू शकतो. असा प्रचंड आत्मविश्वास डॉ.आंबेडकरांना होता. म्हणून डॉ.आंबेडकरांनी संस्कृतीची संज्ञा स्पष्ट करतांना स्त्री म्हणजे संस्कृती होय. अशी उत्तर आधुनिक स्वरुपाची संज्ञा स्पष्ट केली. या स्त्री संस्कृतीने मुलींसोबत मुलांच्या जन्माचे स्वागत केले तर लिंग गुणोत्तर समान असणे सामाजिकरणाच्या दृष्टीने योग्य आहे असे डॉ.आंबेडकराचे मत होते.

**Please cite this Article as :** *डॉ.कल्याण साखरकर , महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर* **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

भारतीय संविधानाने स्त्री व पुरुषांना समान अधिकार व स्वातंत्र्य प्रदान केले आहे. याशिवाय समान न्याय, समान दर्जा, समान प्रतिष्ठा, समान स्वातंत्र्य इत्यादी घटनादत्त अधिकार दिले आहेत. परंतु सामाजिक वास्तवतेचा (Social reality) विचार केला तर स्त्री–पुरुषांमध्ये समान स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता व समान दर्जा व प्रतिष्ठांचा संदर्भ संविधानानुसार आढळत नाही. याकरिता स्त्री–पुरुषांच्या संदर्भात असलेली लिंगाधिष्ठीत असमानता व विशमता कारणीभूत आहे. सदर असमानता ही भारतीय संविधानात्मक नाही तरी ती वैदिक संस्कृती, पुरुषप्रधान सत्तात्मक संस्कृती, वर्णात्मक व जातीय संस्कृती, मनुस्मृतीची संस्कृती, व कन्याहत्याची संस्कृती मुख्यत्वेकरुन जबाबदार आहे. याप्रकारच्या मानवीय मूल्यांप्रती पूर्णतः नकारात्मकतेचे परिपोषण करणा–या संस्कृतीमुळे कन्या हत्येचे प्रमाण वृध्दिंगत होत आहे आणि स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या निर्माण झाली आहे.

भारतीय समाज संरचनेतील ग्रामिण समुदाय, आदिवासी समुदाय व नागरी समुदायातील स्त्री लिंगाच्या गुणोत्तराचा विचार करणे आवश्यक आहे. प्रत्येक समुदायातील कुटुंबाचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक दर्जाचा विचार केला तर स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण समुदायातील कुटुंबान्वये वेगवेगळे असल्याचे आढळून येते. आदिवासी समुदायातील कुटुंबाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती अत्याधिक प्रमाणात कनिष्ठ श्रेणीतील आहे. या कनिष्ठ श्रेणीतील कुटुंबात स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या नाही. ग्रामीण समुदायातील उच्च व कनिष्ठ कुटुंबात स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या नाही तर ग्रामिणातील मध्यम कुटुंबात स्त्रीभृण म्हणजे स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या अंशतः आहे. नागरी समुदायातील उच्च व कनिष्ठ श्रेणीतील कुटुंबात स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या नाही. पण मध्यम कुटुंबात स्त्रीभृण हत्येच्या समस्येने गंभीर वळण घेतले आहे आणि या समस्येतून कुटुंब व विवाह संस्थेवर अयोग्य परिणाम होण्याची शक्यता आहे.

आधुनिक समाजातील पाश्चात्य व भारतीय समाजात पुरुषप्रधान संस्कृतीवर आधारित सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय इत्यादींची असमानता व विषमता आहे. या असमानतेमुळे स्त्रीलिंग गुणोत्तराची समस्या कमी–अधिक प्रमाणात आढळून येत आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीयांवर कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शारीरिक व मानसिक अन्याय–अत्याचार केले जात आहे. या अन्याय व अत्याचारी प्रवृत्तीच्या तिरस्कारामुळे भविष्यात मुलींचा जन्म व्यर्थ आहे. अशी मानसिकता वृध्दींगत होत असल्यामुळे स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या विविध प्रकारचे प्रश्न निर्माण करु शकते.

1)धर्म संरचनेतील लिंग गुणोत्तर

धर्म संरचनेतील स्त्री लिंग गुणोत्तर

| धर्म संरचना | स्त्री लिंग गुणोत्तर | | | |
|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या (प्रतिशत) | मुली (संख्या) | हिंदु धर्मातील अंतर | |
| | | | संख्या | 945 पेक्षा |
| हिंदू | 80.5 | 925 | 0 | - 20 |
| मुस्लिम | 13.4 | 950 | +25 | + 5 |
| ख्रिश्चन | 2.3 | 964 | +39 | + 19 |
| शीख | 1.9 | 786 | -39 | -159 |
| बौध्द | 0.8 | 942 | +17 | -3 |
| जैन | 0.4 | 870 | -55 | -75 |
| अन्य | 0.6 | 976 | +51 | +31 |

काबरा नयत व ईतर – भारत मे आर्थिक वृध्दी एवं विकास गहराते अन्तर्विरोध 1991'–2011 पृ.31)

सारणी क्र.1 अन्वये भारतातील धर्म संरचनेतील स्त्री लिंग गुणोत्तर व धर्मनिहाय स्त्री लिंग गुणोत्तरातील अंतरावरुन असे आढळते की, हिंदू धर्माची लोकसंख्या 80.5 टक्के आहे. हिंदू धर्मात लिंग गुणोत्तर प्रमाण 925 आहे. हे प्रमाण स्त्री पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा अधिक 20 ने कमी आहे. मुस्लिम धर्माची लोकसंख्या 13.4 टक्के असून स्त्री लिग गुणोत्तर 950 आहे. म्हणजेच हिंदू धर्मातील स्त्रीया 25 ने अधिक आहे. तर स्त्री–पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा 5 ने अधिक आहे. ख्रिश्चन धर्माची लोकसंख्या 2.3 टक्के आहे व स्त्री लिंग गुणोत्तर 964 आहे. म्हणजेच हिंदू धर्मातील स्त्रीयांपेक्षा 39 ने अधिक आहे. तर स्त्री–पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा 19 ने अधिक आहे.

भारतात शीख धर्माची लोकसंख्या 1.9 टक्के आहे. आणि शीख धर्मात स्त्री लिंग गुणोत्तर 786 आहे. म्हणजेच हिंदू धर्मातील स्त्रीयांपेक्षा शीख स्त्री लिंग अंतराचे प्रमाण –39 ने कमी आहे. तर स्त्री'–पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा –159 ने कमी आहे. बौध्द धर्माची लोकसंख्या 0.8 टक्के आहे. आणि स्त्री लिंग गुणोत्तर 942 आहे. म्हणजेच हिंदू धर्मातील स्त्रीयांपेक्षा बौध्द धर्मातील स्त्रीयांचे प्रमाण 17 ने अधिक आहे. तर स्त्री–पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा 3 ने कमी आहे. जैन धर्माची लोकसंख्या 0.4 टक्के आहे आणि स्त्री लिंग गुणोत्तर 870 आहे. म्हणजेच हिंदू धर्मातील स्त्रीयांपेक्षा जैन धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तरातील अंतराचे प्रमाण 55 ने कमी आहे. तर स्त्री–पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा 75 ने कमी आहे.

भारतातील अन्य धर्मात यहुदी, पारसी, आदिवासी जमाती व गैरधर्मिय लोकसंख्या 0.6 टक्के आहे. आणि अन्य धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तर 976 आहे. म्हणजेच हिंदू धर्मातील स्त्रीयांपेक्षा अन्य धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तरातील अंतर 51 ने अधिक आहे. तर स्त्री–पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा 31 ने अधिक आहे.

उपरोक्त विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, हिंदू धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तर 925 आहे. या स्त्री लिंगापेक्षा अन्य धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तर 51 ने अधिक आहे. ख्रिश्चन धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तर 39 ने अधिक आहे. मुस्लिम धर्मातील स्त्री लिग गुणोत्तर 25 ने अधिक आहे. बौध्द धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तर 17 ने अधिक आहे. तर हिंदू धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तरापेक्षा जैन धर्मातील स्त्री लिंग

गुणोत्तर 55 ने कमी आहे आणि शीख धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तर 39 ने कमी आहे. म्हणजेच हिंदू धर्मातील स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होते आहे. याकरिता स्त्री–भृण हत्याचे प्रमाण हिंदूमध्ये अधिक आहे. तर जैन व शीख धर्मातील स्त्रीभृण हत्येचे प्रमाण हिंदू धर्मातील स्त्रीयांपेक्षा 55 व 39 ने कमी आहे. यावरुन हिंदू, जैन व शीख धर्मातील स्त्री लिग गुणोत्तर उत्तरोत्तर कमी होत आहे. याकरिता या धर्मात स्त्री–भृण हत्या फार मोठया प्रमाणात केल्या जात आहेत. म्हणून स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या निर्माण झाली आहे.

2) स्त्रीयांचे शिक्षण आणि लिंग गुणोत्तर प्रमाण

सारणी–2

प्रसुतीपूर्व स्त्रीयांचे शिक्षण व लिंग गुणोत्तर

| अ.क्र. | शैक्षणिक स्तर | प्रसुतीकाळाती लिंग गुणोत्तर |
|---|---|---|
| 1 | निरक्षर | 920 |
| 2 | साक्षरता प्राथमिक शाळेपर्यंत | 909 |
| 3 | प्राथमिक ते माध्यमिक शाळापर्यंत | 894 |
| 4 | माध्यमिक शाळा ते हायस्कूलपर्यंत | 885 |
| 5 | शालांत परिक्षा ते पदवी पर्यंत | 867 |
| 6 | पदव्युत्तर पदवी व त्यापेक्षा अधिक | 876 |

काबरा नयन व ईतर – भारत मे आर्थिक वृध्दी एवं विकास गहराते अन्तर्विरोध 1991–2011 पृ.31

सारणी क्र.2 अन्वये प्रसुतीपूर्व स्त्रीयांचे शिक्षण व लिंग गुणोत्तराच्या अध्ययनावरुन असे लक्षात येते की, भारतातील लिंग गुणोत्तराच संदर्भ लक्षात घेतांना स्त्रीयांची साक्षरता विचारात घेणे आवश्यक आहे.

भारतीय समाजात स्त्री–पुरुष साक्षरतेचे प्रमाण असमान आहे. 1951 मध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण 8ः 8ः 6 टक्के होते. 1961 मध्ये 15. 35 टक्के, 1971 21.97, 1981 मध्ये 29.76 टक्के. 1991 मध्ये 39.29 टक्के, 2001 मध्ये 54.16 टक्के तर 2011 मध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण 67 टक्के होते. यावरुन हे स्पष्ट होते की, अशिक्षित स्त्रीयामध्ये स्त्री लिग गुणोत्तराचे अभ्यासातून प्रसुती काळात निरक्षर स्त्रीयांचे स्त्री लिंग गुणोत्तर 120 होते. साक्षरता ते प्राथमिक शाळेपर्यंत शिक्षित स्त्रीयांचे प्रसुती काळातील स्त्री लिंग गुणोत्तर 101 होते. प्राथमिक ते माध्यमिक शाळापर्यंत साक्षर स्त्रीयांचे स्त्री लिंग गुणोत्तर 894 होते. माध्यमिक शाळा ते हायस्कूल पर्यंत साक्षर स्त्रीयांचे स्त्री लिंग गुणोत्तर 885 होते. शालांत परिक्षा ते पदवी पर्यंत शिक्षित स्त्रीयांचे स्त्री लिंग गुणोत्तर 867 होते तर पदव्युत्तर शिक्षण व त्यापेक्षा अधिक शिक्षित स्त्रीयांचे स्त्री लिंग गुणोत्तर 876 होते. यावरुन हे स्पष्ट होते की, भारतातील अशिक्षित वा निरंतर स्त्रीयामध्ये प्रसृतीच्या काळात स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण सर्वाधिक होते. तर सर्वात कमी शालांत परिक्षा ते पदवीपर्यंत शिक्षित स्त्रीयांचे प्रसृती काळातील स्त्री लिग गुणोत्तर 867 होते. त्यानंतर प्राथमिक, उच्च प्राथमिक ते माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा ते हायस्कूल पर्यंत, पदव्युत्तर पदवी आणि पुढे आणि शालांत परिक्षा ते पदवीपर्यंत शिक्षित स्त्रीयांचे प्रसृतीकाळातील स्त्री लिंग गुणोत्तर आहे.

भारतातील लिंग गुणोत्तर प्रमाण

| वर्ष | f 0–6 या वयोगटातील मुल | भारतातील लिंग गुणोत्तर | |
|---|---|---|---|
| | | संख्या | बदल |
| *1901 | | 972 | -- |
| 1911 | | 964 | -8 |
| 1921 | | 955 | -9 |
| 1931 | | 950 | -5 |
| 1941 | | 945 | -5 |
| 1951 | | 946 | +1 |
| 1961 | 976 | 941 | -5 |
| 1971 | 964 | 930 | -11 |
| 1981 | 962 | 934 | +4 |
| 1991 | 945 | 929 | -7 |
| 2001 | 927 | 933 | +6 |
| 2011 | 914 | 940 | +7 |

*Census of India 2011, Government of India, New Delhi, April 2011

f) The world Face book, C.I.A.13 April 2011- Sex ratio in India-Census, www.google.com

सारणी क्र.3 अन्वये भारत व पाश्चात्य राष्ट्रातील स्त्री व पुरुष लिंग गुणोत्तराचा अभ्यास करीत असतांना भारतीय समाज संरचनेतील स्त्रीयांना स्वातंत्र्य व अधिकारापासून वंचित केले जात असल्यामुळे स्त्री लिंग गुणोत्तरात ऱ्हासाचे प्रमाण आढळून येते. तर पाश्चात्य राष्ट्रात स्त्रीयांना अधिकार व स्वातंत्र्य आहे. त्यामुळे स्त्री लिंग गुणोत्तरात वृध्दीचे प्रमाण आढळून येते. भारतीय जनगणनेनुसार 1901मध्ये एक हजार पुरुषांच्या मागे स्त्री लिंग गुणोत्तर 972 होते. 1911 मध्ये 964 होते. 1901 ते 1911या दशकातील स्त्री लिंग गुणोत्तरातील बदल 8 ने कमी झाले. 1921 मध्ये स्त्री लिंग गुणोत्तर 955 होते. 1911 ते 1921 या एका दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदल

9 ने कमी झाले होते. 1931 मध्ये स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण 950 होते. 1921 ते 1931 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदल 5 ने कमी झाले. 1941 मध्ये स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण 945 होते. 1931 ते 1941 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदल 5 ने कमी झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीलिंग गुणोत्तर प्रमाण 25 ने कमी झाले.

स्वातंत्र्योत्तर 1951 च्या भारतीय जनगणनेत स्त्री लिंग गुणोत्तर 946 होते. 1941 ते 1951 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदलात 1 ने वृध्दी झाली कारण पाकिस्तान व बांग्लादेश भारतापासून वेगळे झाले होते. 1961 मध्ये 0–6 वयोगटातील मुलींचे प्रमाण 976 होते. व स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण 941 होते. 1951 ते 1961 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदलात 6 ने घट झाली. 1971 मध्ये 0–6 या वयोगटातील मुलींचे प्रमाण 964 होते व स्त्री लिंग गुणोत्तर 930 होते. 1961 ते 1971 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदलात 11 ने घट झाली. 1981 मध्ये 0–6 या वयोगटातील मुलींचे प्रमाण 962होते. व स्त्री लिंग गुणोत्तर 934 होते. 1971 ते 1981 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरात 4 ने वृध्दी झाली. 1991 मध्ये 0'–6 या वयोगटातील मुलींचे प्रमाण 945 होते. स्त्री लिंग गुणोत्तर 921 होते. 1981 ते 1991 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदलात 7 ने घट झाली. 2001 मध्ये 0–6 या वयोगटातील मुलींचे प्रमाण 927 होते व स्त्री लिंग गुणोत्तर 933 होते. 1991 ते 2001 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदलात 6 ने वृध्दी झाली. तर 2011 मध्ये 0–6 या वयोगटातील मुलींची संख्या 914 आहे. व स्त्रीयांचे लिंग गुणोत्तर 940 होते. 2001 ते 2011 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदलात 7 ने वृध्दी अधिक होते.

उपरोक्त विवेचनावरुन स्वातंत्र्यपूर्व भारतात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदलात घट असल्याचे आढळून येते. तर स्वातंत्र्योत्तर भारतात 1941–51, 1971–81, 1991 ते 2001 आणि 2001 ते 2011 या प्रत्येक दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदलात वृध्दीचे प्रमाण आढळुन येते तर 1951–61, 1961–71, 1981–91 या प्रत्येक दशकात स्त्री लिंग गुणोत्तरातील बदलात घटते प्रमाण आढळून येते. त्यामुळे भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात स्त्री लिंग गुणोत्तरातील घटत्या बदलामुळे स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या निर्माण झाली आहे.

*सारांश :–*

भारतीय समाजसंरचनेतील लिंग गुणोत्तर प्रमाणात स्त्री लिंग गुणोत्तर प्रमाणात घट आढळून येते. याकरिता भारतीय समाजातील वैदिक संस्कृती पुरुषीसत्ताक समाज, मनुस्मृती, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेने स्त्रीयांना कनिष्ठ दर्जा प्रदान केला. त्यामुळे स्त्रीयांप्रती असमानता व विषमता आढळून येते. या असमानता व विषमतेच्या विरुध्द समाज सुधारकांनी प्रबोधन केल्यामुळे स्त्रीयांच्या दर्जात अंशतः परिवर्तन झालेले आहे. या अंशत परिवर्तनाकरिता भारतीय संविधानातील स्त्रीविषयक कायदे उत्तरदायी आहेत.

भारतीय संविधानात लिंग गुणोत्तराप्रती समानता आहे. या संविधानातील स्त्री विषयक कायद्याप्रती लोकांची उच्च श्रेणीतील सकारात्मकता निर्माण होईल तेव्हाच लिंग गुणोत्तराची विषमता नष्ट होईल. आणि या करिता स्त्रीयांनी समाजाच्या मानसिकतेत बदल घडविण्याकरिता संसदीय मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री म्हणजे संस्कृती ही संज्ञा सामाजिक मनात प्रज्वलित करण्याचे कार्य स्त्रीयांनी केले तरच स्त्रीयांच्या सामाजिक दर्जात क्रांतिकारी सुधारणा घडून येईल आणि समतावादी सामाजिक संरचनेचे निर्मिती होईल. या निर्मितीतून सर्व स्तरातील समाजाचा सामाजिक विकास घडून येईल.

### *आंतरराष्टीय स्तरावरील लिंग गुणोत्तराचे तुलनेत भारतातील सद्याची स्थिती :–*

लिंग गुणोत्तराचे समाजशास्त्रीय विश्लेषण करतांना पाश्चात्य व भारतीय समाजात सामाजिक विकासाच्या प्राथमिक स्तरात स्त्री–पुरुष हयांच्यात परस्पर संबंध व परस्परपुरकतेचे तत्व प्रचलित होते. सदर संदर्भ भारतातील मातृसत्ताक समाज संरचनेत आढळून येतो. या संरचनेतील शिकारी अवस्थेत स्त्री व पुरुष हे दोघेही शिकारीला जात असत. त्यामुळे स्त्रीयांना पुरुषांप्रमाणे स्वातंत्र्य व अधिकार होते. स्त्री–पुरुष यांना ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान, अर्थकारण, समाजकारण, शैक्षणिकीकरण, धर्मकारण, संरक्षण ईत्यादीत समान स्वातंत्र्य व अधिकार दिले गेले होते. त्यामुळे स्त्री–पुरुषांचा दर्जा उच्च श्रेणीतील होता. विशेषतः स्त्री ही गुरुपेक्षा श्रेष्ठ होती. त्यामूळे सर्व प्रकारच्या क्रिया, व्यवहार व संवादात निकोप व सकसतेने सामाजिकरणाची प्रक्रिया जबाबदारीने पार पाडली जात होती. त्यामुळे कौटुबिक, आर्थिक व सामाजिक विकासाच्या संदर्भामुळेच स्त्री व पुरुषांमध्ये लिंग गुणोत्तरात समानता होती.

मातृसत्ताक समाज संरचनेतील शेती अवस्थेत मानवी श्रमांऐवजी पशुंचा अवलंब करण्याच्या क्रिया व व्यवहारांमुळे मातृसत्ताक सत्तेचा पराजय झाला आणि पुरुषप्रधान समाज संरचना प्रस्थापित झाली. या संरचनेतील स्त्री व पुरुष लिगातील परस्पर संबंध व परस्परपुरकतेचे नैसर्गिक तत्व अस्विकृत केले आणि केवळ पुरुषांना ज्ञान विज्ञान व तंत्रज्ञान, अर्थकारण, समाजकारण, राजकारण, संरक्षणात्मक, शैक्षणिकीकरण व धर्मकारणात अधिकार व स्वतंत्रता प्राप्त झाली. तर स्त्रीयांना या सर्व अधिकार व स्वातंत्र्यापासून वंचित केले गेले. त्यामुळे स्त्रीयांना प्राथमिक दर्जाऐवजी दुर्यिम दर्जा प्रदान केला.

या समाज संरचनेतील बदलामुळे स्त्रीयांप्रती नकारात्मक विचारधारा वा आचारसंहिता निर्माण केली. या आचारसंहितेमुळे स्त्रीयांचे शारीरिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक व मानसिक शोषण करणे पुरुषी संस्कृतीचा अधिकार आहे अशी समाज संरचना रुढ झाली. मनुस्मृती काळात तर स्त्रीयांचे गृहकार्याशी संबंधित जीवनाव्यतिरिक्त अन्य समाज संरचनात्मक कार्याप्रतीच्या जीवनात बंदिस्तता निर्माण केली आणि स्त्री या समाजघटकाला मुलभूत अधिकार व स्वातंत्र्यापासून वंचित करण्याच्या आचारसंहितेला प्रमाणता प्राप्त झाली. या मनुस्मृती निर्मित आचारसंहितेने स्त्रीयांना कनिष्ठ श्रेणीतील दर्जा प्रदान केल्यामुळे विविध विषयांच्या संदर्भातील क्रिया, व्यवहार व संवादातून निकोप व सकस सामाजिकरणाची प्रक्रिया जबाबदारीने पार पाडण्यात आली नाही. त्यामुळे स्त्रीयांच्या व्यक्तिमत्वाचा विकासात अवरोध निर्माण झाला. पर्यायाने कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, मानसिक व शैक्षणिक विकासही घडून आला नाही. पण लिंगाधिष्ठीत गुणोत्तराची समस्या निर्माण झाली. यांशिवाय भारतातील बालविवाह, सतीप्रथा, स्त्री शिक्षण विरोध, केशवपन, विधवा पुर्नविवाह विरोध, हुंडाप्रथा, यांसारख्या अनिष्ट प्रथा मनुस्मृतीच्या संस्कृतीने निर्माण केल्यामुळे स्त्रीया अपवित्र व अयोग्य आहेत. या मनोवृत्तीने स्त्रीयांच्या जन्माचे स्वागत करण्याऐवजी अवमान, अपमान व अवहेलनेचे प्रमाण उत्तरोत्तर कमी असल्यामुळे स्त्रीयांचे स्थायित्व अमान्य केल्या गेले.

विकसित राष्ट्रापेक्षा भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात स्त्रीलिंग गुणोत्तराची समस्या अधिक आहे. कारण आधुनिक समाजातील नवनवीन ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान अर्थकारण, राजकारण, समाजकारण, संचारीकरण व शैक्षणिकीकरणामुळे विकासाची प्रक्रिया गतिशील स्थितीत नाही. याकरिता संविधानात्मक संस्कृतीच्या प्रती समाजातील अधिकांश लोकसंख्येची नकारात्मक मानसिकता उत्तरदायी आहे. तर विकसित व प्रगत राष्ट्रामध्ये विकासाची प्रक्रिया गतिमान स्थितीत असल्यामुळे स्त्री लिंग गुणोत्तराची समस्या नाही. कारण लिंगावर आधारित असमानता वा विषमतेचे पालन करणे कायद्यान्वये गुन्हा आहे. अशा प्रकारची मनोवृत्ती असल्यामुळे लिंग विषमतेचा संदर्भ आढळत नाही.

**Please cite this Article as :** *डॉ.कल्याण साखरकर , महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर* **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

भारत व पाश्चात्य राष्ट्रातील स्त्री पुरुष लिंग गुणोत्तर

| वर्ष | f 0–6 या वयोगटातील मुल | भारतातील लिंग गुणोत्तर | | पाश्चात्य राष्ट्रातील लिंग गुणोत्तर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | बदल | राष्ट्रे | 2001 | 2011 |
| *1901 | | 972 | -- | रशिया | 1140 | 1165 |
| 1911 | | 964 | -8 | फ्रांस | 1041 | 1056 |
| 1921 | | 955 | -9 | जपान | 1041 | 1054 |
| 1931 | | 950 | -5 | जर्मनी | | 1038 |
| 1941 | | 945 | -5 | इंग्लंड | | 1037 |
| 1951 | | 946 | +1 | ब्राझिल | 1025 | 1031 |
| 1961 | 976 | 941 | -5 | दक्षिण आफ्रिका | ... | 1028 |
| 1971 | 964 | 930 | -11 | अमेरिका | 1029 | 1026 |
| 1981 | 962 | 934 | +4 | कोरिया | | 1020 |
| 1991 | 945 | 929 | -7 | ऑस्ट्रेलिया | | 1011 |
| 2001 | 927 | 933 | +6 | इथिओपिया | | 1010 |
| 2011 | 914 | 940 | +7 | इंडोनेशिया | 1004 | 1003 |
| | | | | नायजेरिया | 1016 | 995 |
| | | | | मलेशिया | | 970 |
| | | | | इराण | ... | 968 |
| | | | | भारत | 933 | 940 |
| | | | | चीन | 944 | 927 |
| | | | | सौदी अरेबिया | ... | 927 |
| | | | | पाकिस्तान | 938 | 958 |
| | | | | बांगलादेश | 953 | |
| | | | | व्हिएतनाम | 1020 | |
| | | | | नेपाळ | 1041 | |
| | | | | ईज्रायल | 1000 | |

*Census of India 2011, Government of India, New Delhi, April 2011

f) The world Face book, C.I.A.13 April 2011- Sex ratio in India-Census, www.google.com

पाश्चात्य राष्ट्रातील लिंग गुणोत्तराच्या अभ्यास केला तर अधिकांश राष्ट्रात पुरुष लिंगापेक्षा स्त्री लिंगाची संख्या अधिक आढळून येते. रशिया या राष्ट्रात 2001 मध्ये 1140 व 2011 मध्ये 1165 असे स्त्रीयांचे गुणोत्तर होते. फ्रांस मध्ये 2001 मध्ये 1041 व 2011 मध्ये 1056 असे स्त्रीयांचे लिंग गुणोत्तर होते. जपान या राष्ट्रात 2001 व 2011मध्ये 1041 व 1054 असे स्त्री लिंग गुणोत्तर होते. ब्राझील या राष्ट्रात 2001 मध्ये 1025 व  2011 मध्ये 1031 असे स्त्री लिंग गुणोत्तर होते. अमेरिका या राष्ट्रात 2001 व 2011 मध्ये स्त्री लिंग गुणोत्तर 1029 व 1026 असे प्रमाण होते. इंडानेशियात 2001 ते 2011 मध्ये लिंग गुणोत्तर प्रमाण 1004 व 1003 होते. नायजेरियात 2001 ते 2011 मध्ये लिंग गुणोत्तर प्रमाण 1016 व 995 होते. भारतात 2001 ते 2011 मध्ये लिंग गुणोत्तर प्रमाण 933 व 940 होते. चीन या राष्ट्रात 2001 ते 2011 मध्ये लिंग गुणोत्तर प्रमाण 944 व 927 होते. तर पाकिस्तानात 2001 ते 2011 मध्ये लिंग गुणोत्तर प्रमाण 938 व 958 होते.

पाश्चात्य राष्ट्रातील ऑस्ट्रेलियात 2011 मध्ये स्त्री लिंग गुणोत्तर 1011 होते. दक्षिण आफ्रिका 1028, जर्मनी 1038, कोरिया 1020 स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण आहे. इंग्लंड 1037, इथिओपिया 1010, मलेशिया 970, ईराण 868, सौदे अरेबिया 927 असे लिंग गुणोत्तर प्रमाण आहे.

पाश्चात्य राष्ट्रातील पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा स्त्री लिंग गुणोत्तराच्या प्रमाणाची संख्या अधिक आहे. कारण स्त्री व पुरुष या समाजघटकांना संविधानाने स्वातंत्र्य व अधिकार प्रदान केले आहे. त्यामुळे नाविन्यपूर्ण जीवन शैलीला संरचनावादी संस्कृतीचे स्वरुप प्रदान केले जात असल्यामुळे पुरुषांपेक्षा स्त्री लिंग गुणोत्तर प्रमाण अधिक असल्याचे सांख्यिकीयीवरुन स्पष्ट होते'.

**Please cite this Article as :** *डॉ.कल्याण साखरकर , महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर :* **Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**